# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

### प्रशासकीय ठराव दिनांक ६ / ५ /२०२५

**प्रकरण क्र. ( ५६ )** :- प्रशासकीय ठराव क्र. २३३ दि.०९/१०/२०२४ नुसार खाजगी पाणी स्त्रोतातून टँकरद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या पुरवठाधारकांना देण्यात येणाऱ्या नोंदणी परवाना शुल्क व सुरक्षा अनामत रक्कम यामध्ये अंशत: बदल करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ( ५६ )**

## कार्यलयीन प्रस्तावना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, राधाबिनोद शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन प्रशासकीय ठराव क्र.२३३ दि. ०९/१०/२०२४ नुसार खाजगी पाणी स्त्रोतातून टँकरद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या पुरवठाधारकांना देण्यात येणाऱ्या नोंदणी परवाना शुल्क व सुरक्षा अनामत रक्कम यामध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

**अ) खाजगी पाणी स्त्रोतातून टँकरद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकराना नोंदणी परवाना देणे –**

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागामार्फत खाजगी टँकरधारकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्याचे नोंदणी परवाना देणेबाबतचे दर व अटीशर्ती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

६. ५०० लीटर क्षमतेच्या टँकर परवान्यासाठी रु.१,०००/- इतकी रक्कम परवाना शुल्क म्हणून भरणे आवश्यक आहे.

७. ५०१ लीटर ते २००० लीटर क्षमतेच्या टँकर परवान्यासाठी रु.२,०००/- इतकी रक्कम परवाना शुल्क म्हणून भरणे आवश्यक आहे.

८. २००१ लीटर ते १०००० लीटर क्षमतेच्या टँकर परवान्यासाठी रु.४,०००/- इतकी रक्कम परवाना शुल्क म्हणून भरणे आवश्यक आहे.

९. परवान्यासाठी रु.५,०००/- इतकी सुरक्षा अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

१०. केंद्रीय भूमि जल प्राधिकरण सन - २०२० अधिनियमानुसार खाजगी टँकरमार्फत व्यवसायिक पाणीपुरवठा करणाऱ्या खाजगी टँकर मालकांना केंद्रिय भूमि जल प्राधिकरणामार्फत ना हरकत दाखला घेणे बंधनकारक आहे.

उपरोक्त प्रमाणे खाजगी पाणी स्त्रोतातून टँकरद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या पुरवठाधारकांना देण्यात येणाऱ्या नोंदणी परवाना शुल्क व सुरक्षा अनामत रक्कम यामध्ये अंशत: बदल करणे कामास प्रशासकिय ठरावाव्दारे आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ५६ दिनांक ६/५/२०२५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, राधाबिनोद शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन प्रशासकीय ठराव क्र.२३३ दि. ०९/१०/२०२४ नुसार खाजगी पाणी स्त्रोतातून टँकरद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या पुरवठाधारकांना देण्यात येणाऱ्या नोंदणी परवाना शुल्क व सुरक्षा अनामत रक्कम यामध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

**अ) खाजगी पाणी स्त्रोतातून टँकरद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकराना नोंदणी परवाना देणे —**

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागामार्फत खाजगी टँकरधारकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्याचे नोंदणी परवाना देणेबाबतचे दर व अटीशर्ती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

१. ५०० लीटर क्षमतेच्या टँकर परवान्यासाठी रु.१,०००/- इतकी रक्कम परवाना शुल्क म्हणून भरणे आवश्यक आहे.

२. ५०१ लीटर ते २००० लीटर क्षमतेच्या टँकर परवान्यासाठी रु.२,०००/- इतकी रक्कम परवाना शुल्क म्हणून भरणे आवश्यक आहे.

३. २००१ लीटर ते १०००० लीटर क्षमतेच्या टँकर परवान्यासाठी रु.४,०००/- इतकी रक्कम परवाना शुल्क म्हणून भरणे आवश्यक आहे.

४. परवान्यासाठी रु.५,०००/- इतकी सुरक्षा अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

५. केंद्रीय भूमि जल प्राधिकरण सन - २०२० अधिनियमानुसार खाजगी टँकरमार्फत व्यवसायिक पाणीपुरवठा करणाऱ्या खाजगी टँकर मालकांना केंद्रिय भूमि जल प्राधिकरणामार्फत ना हरकत दाखला घेणे बंधनकारक आहे.

उपरोक्त प्रमाणे खाजगी पाणी स्त्रोतातून टँकरद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या पुरवठाधारकांना देण्यात येणाऱ्या नोंदणी परवाना शुल्क व सुरक्षा अनामत रक्कम यामध्ये अंशत: बदलास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

वरील पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनिसारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(राधाबिनोद शर्मा) भाप्रसे
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

## दि. ८/ ५ /2025

प्रकरण क्र. ५८ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ठोक मानधनावरील लघुटंकलेखक यांच्या मुदतवाढीबाबत..

**कार्यालयीन प्रस्ताव**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत मा.स्थायी समिती सभा दि.09/01/2015 प्रकरण क्र.132, ठराव क्र.126 अन्वये 04 लघुटंकलेखक यांची ठोक मानधनावर सहा महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे. मा.प्रशासकीय सभा दि.22/08/2024, ठराव क्र.128 अन्वये श्री.गुणवंत दयाराम सपकाळे, लघुटंकलेखक यांचे दि.16/10/2024 ते दि.15/04/2025 पर्यंत 06 महिन्यांकरीता नियुक्तीचे नविकरण करण्यात आलेले आहे. सदर लघुटंकलेखकाची मुदत दि.15/04/2025 रोजी संपुष्टात आलेली आहे.

महानगरपालिका मा.महासभा, मा.स्थायी समिती सभा, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उपायुकत (मुख्यालय) यांचे बैठकांचे इतिवृत्तांत, प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृत्तांत लिहिण्यासाठी लघुटंकलेखकांची आवश्यकता आहे. करीता यापुढे ज्या ज्या वेळी श्री.गुणवंत दयाराम सपकाळे, लघुटंकलेखक यांची मुदत संपुष्टात येईल, त्यावेळी मुदत वाढीसाठी नगरसचिव विभागाकडे अभिप्राय न मागता उक्त लघुलेखकाची मुदतवाढ प्रस्तावित करणेबाबत नगरसचिव विभागाने दि.09/08/2024 रोजीच्या पत्रान्वये शिफारस केलेली आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-2025 आगामी काळात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मा.स्थायी समिती सभा, मा.महासभा बैठकीकरीता लघुटंकलेखक यांची आवश्यकता भासणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(3) अन्वये नगरपालिका अधिकारी/कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल तसेच आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक 06 महिन्यांहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही, असे नमुद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मुदत संपत असल्याने शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26 ऑगस्ट, 2022 अन्वये आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

श्री.गुणवंत दयाराम सपकाळे, लघुलेखक यांची दि.15/04/2025 रोजी मुदत संपुष्टात आलेली असून, दि.16/04/2025 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात आलेला आहे. त्यानुसार दि.17/04/2025 ते दि.16/10/2025 पर्यंत 06 महिन्यांकरीता नियुक्तीचे नविकरण करणेबाबतच्या प्रस्तावास मा.प्रशासक यांची मंजुरी मिळावी असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आला आहे.

# प्रशासकीय ठराव क्र. ५० दिनांक ६/५/२०२५

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ठोक मानधनावरील लघुटंकलेखक यांच्या मुदतवाढ मिळणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एनसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "श्री.गुणवंत दयाराम सपकाळे, लघुलेखक यांची दि.15/04/2025 रोजी मुदत संपुष्टात आलेली असून, दि.16/04/2025 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात आलेला आहे. त्यानुसार दि.17/04/2025 ते दि.16/10/2025 पर्यंत 06 महिन्यांकरीता नियुक्तीचे नविकरण करणेबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अरिबम शर्मा, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाही करीता सादर.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व तंत्रज्ञान विभाग

## प्रशासकीय ठराव दि. ६/५/२०२५

**प्रकरण क्र. ५८** **Development and Implementation Of Online RTS Services Under RTS Act 2015 with 5 Year Customization AMC And Support विकसित करणेकामी (५ वर्ष कालावधीकरिता) मंजूरी देणे.**

**ठराव क्र.:- ५८**

Development and Implementation Of Online RTS Services Under RTS Act २०१५ with ५ Year Customization AMC And Support विकसित करणेकामी जा.क्र. मनपा/मा.तं/४१८४४४७ /२०२४-२५, https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ११/०२/२०२५ रोजीची निविदा सुचना उर्दू टाईम्स, आपलं महानगर व ठाणे वैभव या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेचे टॅडर आयडी (**Tender ID २०२५_MBMC_११४९२६७_१**) आहे. सदर निविदेस प्रतिसाद मिळून एकूण तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांपैकी M/s. Ascentech Information TechnologyY Pvt Ltd, M/s. DSS World Private Limited व M/s. Geetsys Solutions यांनी निविदा अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर केल्याने ते पात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारक M/s. Geetsys Solutions यांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| Sr. No | Descriptin | Qty | M/s. Geetsys Solutions यांचे निविदेतील दर Rates in Rs. For Five Years | M/s. Geetsys Solutions यांचे वाटाघाटीनंतचे दर Rates in Rs. For Five Years | M/s. Ascentech Information Technology Y Pvt Ltd Rates in Rs. For Five Years | M/s. DSS World Private Limited Rates in Rs. For Five Years |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Online RTS Services for 5 Years - Design,Development & Upgrade with latest Technology A)Property Tax, Water Tax and Birth and Death module integration with RTS system.B)Fire Module integration with RTS system.C)Marriage Module ntegration with RTS System.D)Trade License Module integration with RTS system.E)Estate Module integration with RTS system.F) Advertisement Module integration with RTS system. | 1 | 14210000 | 12042372.88 | 14427500 | 14500000 |
| 2 | Integration with Aaple Sarkar, Maitri Portal , All existing & future MBMC applications , mbmc portal and 5 Year IGR portal | 1 | 8869000 | 7516101.69 | 9004750 | 9504000 |
| 3 | Upgraded Cloud Service with (lastest configuration, Speed, RAM, bandwidth and Space) (for 5 years) | 1 | 588000 | 498305.08 | 597000 | 700000 |
| 4 | AMC & Support for 5 years after Go-Live | 1 | 490000 | 415254.24 | 497500 | 500000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | Any add-on RTS Services notified by government. | 1 | 441000 | 373728.81 | 447750 | 500000 |
| **Total** | | | **24598000** | **20845762.7** | **24974500** | **25704000** |
| | **GST 18%** | | **4,427,640** | **3,752,237** | **4,495,410** | **4,626,720** |
| | **Total Amount** | | **29025640** | **24598000** | **29469910** | **30330720** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता पात्र निविदाधारक M/s Geetsys Solutions (L1 निविदाधारक) यांनी निविदेत सादर केलेले दर हे निविदाधारक M/s.Ascentech Information Technology Pvt Ltd (L2 निविदाधारक) व M/s. DSS World Private Limited (L3 निविदाधारक) यांच्या तुलनेत कमी आहेत. सदरकामी रु. 24598000/- (अधिक GST) खर्च होणार आहे. सदरकामी COEP TECHNOLOGICAL UNIVERSITY Technical Sanction यांची रु. २५१३६४०० रक्कमेची तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे. निविदाधारक M/s. Geetsys Solutions (L1 निविदाधारक) यांना दि. 16/04/2025 रोजी वाटाघाटी बोलावले असता वाटाघाटीअंती रु. २,४५,९८०००/- (GST सह) दर सादर केलेले आहेत. M/s.Geetsys Solutions यांचे वाटाघाटीनंतर सादर केलेले दर बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असल्याने M/s. Geetsys Solutions(L1 निविदाधारक) यांनी वाटाघाटीनंतर सादर केलेल्या दरास मंजूरी मिळणेस निविदा समितीने दि. १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीत शिफारस केलेली आहे.

निविदाधारक M/s Geetsys Solutions (L1 निविदाधारक) यांनी Development and Implementation Of Online RTS Services Under RTS Act २०१५ with ५ Year Customization AMC And Support विकसित करणेकामी वाटाघाटीनंतर सादर दरास व करारनामा करून कार्यादेश प्रदान करणेस तसेच गोषवारा मा. प्रशासकीय सभेत करणेस मा. आयुक्त सो. यांची दि.27/04/2025 रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(क) नुसार यांनी Development and Implementation Of Online RTS Services Under RTS Act 2015 with 5 Year Customization AMC And Support विकसित करणेकामी L1 निविदाधारक) M/s Geetsys Solutions यांना रू. 20845762.7+ 3752237 (18%) = एकूण रू. 24598000/- (GST सह) रक्कमेचा कार्यादेश प्रदान करणेस व होणाऱ्या रू. रु. 2,45,98000/- (GST सह) खर्चास मा. प्रशासक यांचे सभेत मंजूरी मिळणेस शिफारस करण्यात येत आहे. पारित ठरावानुसार संबंधित विभागाने पुढील योग्य कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पे ॲण्ड पार्क विभाग
## मा.प्रशासकीय सभा ठराव दि. ६/५/२०२५
## पे ॲण्ड पार्क विभाग

प्रकरण क्र. ५१ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दित भाईंदर पश्चिम रेल्वेस्टेशन जवळ स्काय वॉक खाली येथील पे ॲण्ड पार्क वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेकरिता E-Tendering पध्दतीने निविदा काढणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रशासकीय ठराव क्र. ५१

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन जवळ स्काय वॉक खालील जागेत पे ॲण्ड पार्क ठेका पध्दतीने मे. ए.वन केअरटेकर प्रा.लि. यांना दि.१०/०५/२०२२ ते दि.०९/०५/२०२५ पर्यंत चालविण्याकरिता देण्यात आलेला आहे. सदर कालावधीत मे. ए वन केअरटेकर प्रा.लि. यांनी निविदेत तीन वर्षाचे कालावधीकरिता रक्कम रुपये **३१,७९,३५८/-** इतकी सादर केलेली आहे. मे. ए.वन केअरटेकर प्रा.लि. यांची पे ॲण्ड पार्क ठेका मुदत दि.०९/०५/२०२५ रोजी संपुष्ठात येत आहे. सदरचा ठेका संपुष्ठात येण्यापूर्वी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

सदर वाहनतळात एकूण दुचाकी वाहनांची क्षमता १०६ आहे. सदर वाहनांकरिता मे. ए.वन केअरटेकर प्रा.लि. यांनी निविदेत तीन वर्षाचे कालावधीकरिता रक्कम रुपये **३१,७९,३५८/-** इतकी सादर केलेली होती.

त्याअनुषंगाने मागील ठेकेदाराने ३ वर्षाकरिता निविदेत सादर केलेली मुल्याधारित रक्कम रुपये **३१,७९,३५८/-** गृहित धरुन ई-टेंडर पध्दतीने निविदा काढण्यात येत आहे.

तरी भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन जवळ स्काय वॉक खालील जागेत पे ॲण्ड पार्क सद्यस्थितीतील ३ वर्षाची महानगरपालिकेस प्राप्त होणारी रक्कम रु. **३१,७९,३५८/-**वसुल होत असल्याचे गृहित धरुन सदर रकमेवर म्हणजे रक्कम रुपये ३१,७९,३५८/-इतकी ३ वर्षाचे कालावधीकरिता वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देऊन E-Tendering पध्दतीने निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद शर्मा, भाप्रसे)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका